**मे. ए.सी.सी. लि., घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर या कंपनीच्या मौजा कुरई, कुर्ली, सिंदोला, ता. वणी, जि. यवतमाळ येथे कुरई लाईमस्टोन ब्लॉक या प्रकल्पाची ४८०.८० हेक्टर क्षेत्रामध्ये ६.२९३ दशलक्ष टन/वर्ष उत्पादन क्षमतेच्या प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १८/०९/२०२४ |
| वेळ | : | सकाळी ११:०० वाजता |
| स्थळ | : | प्रकल्प स्थळ, मौजा मौजा कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ. |

**<u>प्रस्तावना:-</u>**

मे. ए.सी.सी. लि., घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर या कंपनीच्या मौजा कुरई, कुर्ली, सिंदोला, ता. वणी, जि. यवतमाळ येथे कुरई लाईमस्टोन ब्लॉक या प्रकल्पाची ४८०.८० हेक्टर क्षेत्रामध्ये ६.२९३ दशलक्ष टन/वर्ष उत्पादन क्षमतेच्या प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी जिल्हा-यवतमाळ, महाराष्ट्र या प्रकल्पाच्या उभारणीच्या पर्यावरणविषयक प्रस्तावाबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी टीओआर (TOR) दिनांक १३ ऑक्टोबर २०२३ रोजी मान्यता दिलेली आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग ए-१ (अ) मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

मे. ए.सी.सी. लि., घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर, महाराष्ट्र यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक २८/०५/२०२४ अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी यवतमाळ, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १८ सप्टेंबर, २०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता प्रत्यक्ष (physical) आणि पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली. त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र नवराष्ट्र, नागपूर एडिशन यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया, नागपूर यात इंग्रजीत दिनांक ०८/०८/२०२४ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा बैठक नंबर व बैठक पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यात नियोजित

प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांनी एक लेखी आक्षेप प्राप्त झालेला आहे.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिएल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर.
३. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२.
४. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
६. जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ.
७. जिल्हा परिषद, यवतमाळ.
८. जिल्हा उद्योग केंद्र, यवतमाळ.
९. उप-विभागीय कार्यालय, यवतमाळ.
१०. नगर परिषद, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ.
११. तहसिल कार्यालय, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ.
१२. पंचायत समिती कार्यालय, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ.
१३. ग्राम पंचायत कार्यालय, कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ.
१४. ग्राम पंचायत कार्यालय, ढाकोरी, ता. वणी, जि. यवतमाळ.
१५. ग्राम पंचायत कार्यालय, गोवारी, ता. वणी, जि. यवतमाळ.
१६. ग्राम पंचायत कार्यालय, देऊरवाडा, ता. वणी, जि. यवतमाळ.
१७. ग्राम पंचायत कार्यालय, बोरी, ता. वणी, जि. यवतमाळ.

वरिल अनुक्रमांक ०६ ते १७ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदरहू जनसुनावणी ही प्रकल्पा स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

यांनी कार्यालयीन आदेश ई-१५४/२०२४ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (ड्बल्युपीसी) पीएच/बी-२४०९०६-एफटीएस-०१४८ दिनांक ०६/०९/२०२४ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, यवमताळ किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | समन्वयक |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत १६३ सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ व ३ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**जनसुनावणीचे इतिवृत्तः-**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री उमाशंकर भादुले, क्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. पंकज आशिया, जिल्हादंडाधिकारी यवतमाळ तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. तानाजी यादव, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही स्थानिक, प्रकल्पग्रस्त यांच्यासाठीच आयोजित करण्यात आलेली असून, जेणेकरून पर्यावरणविषयक प्रश्न, शंका यांचे निरसन होईल.

आयोजक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ

ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

आयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या:-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश,नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र,प्रकल्पाचे वैशिष्ट्ये,प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतक-यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

आयोजक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**<u>जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-</u>**

**१) <u>श्री. राजू खेडकर, कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने कोणत्याही प्रकारची शेतकऱ्यांची मदत केलेली नाही. आम्ही वारंवार तक्रारी केल्या परंतु आमच्या तक्रारीची दखल घेण्यात आली नाही. मागील ३२ वर्षांत फक्त एकदा ५०००, १०००० व १५००० इतकी रक्कम | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.११ मध्ये नमूद आहे. |

| | | |
|---|---|---|
| | देण्यात आली होती. परंतु त्यानंतर काहीच मोबदला देण्यात आला नाही. शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा लाभ देण्यात आलेला नाही. आमच्या जमीनी नापिक झालेल्या आहेत. कंपनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचा प्रश्न सर्वप्रथम सोडविण्यात यावा व त्यानंतरच कंपनीला परवानगी देण्यात यावी. | |

२) **श्री. दत्ता विठ्ठल मोगरे, कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्प प्रवर्तकाने सर्वप्रथम जमीनधारकांना विश्वासात घ्यायला हवे होते. गावकऱ्यांमध्ये शंकेचे वातावरण तयार झाले आहे की कंपनी गावकऱ्यांची जमीन अधिग्रहीत करणार आहे किंवा नाही. जमीनधारकांची जमीनीबाबत जनसुनावणी घ्यायला हवी होती. गावकऱ्यांमध्ये शंका आहे की प्रकल्प प्रवर्तक त्यांच्या जमीनी विकत घेणार किंवा कसे? कंपनी प्लांट उभा करत आहे परंतु जागा निश्चित केलेली नाही. तसेच कंपनीने मोबदल्याची रक्कत देखील ठरवलेली नाही व योग्य मोबदला देणार किंवा कसे याबाबत देखील साशंकता आहे. कंपनीने सांगितले की, धुळीमुळे होणाऱ्य नूकसानीची भरपाई देण्यात येते परंतु कंपनीने घुग्घूस येथील एसीसी लि कंपनीमुळे झालेल्या नूकसानीची भरपाई फक्त एकदाच दिलेली आहे. अनेकदा निवदेन देऊन काही फायदा झालेला नाही. सिमेंट उद्योगाच्या प्रदूषणामुळे शेतकऱ्यांचे नूकसान होत आहे. परंतु याकडे सर्वांचे दुर्लक्ष होत आहे. एसीसी लि कुरई ही कंपनी एकूण १२०० एकर जमीन संपादित करणार आहे. त्याबाबत शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत निवेदन देत आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या जमीनीचा मोबदला रू. ८० लक्ष प्रति एकर किंवा त्यापेक्षा अधिक देण्यात यावा. जमीनधारकाला किंवा त्याच्या घरातील किमान एका व्यक्तिला प्रकल्पामध्ये कायमस्वरूपी रोजगार देण्यात यावा. ८०% स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात यावे व कायमस्वरूपी रोजगार द्यावा. जमीनीच्या मोबदल्याबाबत जनसुनावणी घेण्यात यावी. जमीन अधिग्रहीत केलेली नाही व त्याकरिता गावकऱ्यांशी संपर्क साधला गेला नाही. कंपनीने जमीन अधिग्रहण प्रक्रियेबाबत गावकऱ्यांना कोणतीही माहिती | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.११ मध्ये नमूद आहे. |

| | |
|---|---|
| | दिलेली नाही. आमच्या माहितीनूसार एखादी जनसुनावणी प्रकिया पूर्ण झाल्यावर कंपनी जमीन अधिग्रहणासाठी विभाजनाचे राजकरण करू शकते व त्यामुळे गरीब शेतकऱ्यांना त्यांच्या जमीनीचा योग्य मोबदला मिळणार नाहीी व बाधित शेतकऱ्यांच्या उपजिविकेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शेतीवर अवलंबून असणाऱ्या इतर मजूरांचा देखील विचार करण्यात यावा व त्यांनादेखील अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात याव्या. | |

३) **श्री. अजय कवरासे, सरपंच ग्रामपंचायत झाकोरी, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पालगत २ नद्यांचे उगमस्थान आहे. गट नं. ८७ व ४५ मधून उगम पावणाऱ्या नद्या झाकोरी गावातून वाहतात. सदर प्रकल्पामुळे या नद्यांचे पाणी कमी होईल व त्याचा परिणाम आमच्या झाकोरी गावावर होईल व पाणी टंचाईची समस्या उद्भवणार. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.११ मध्ये नमूद आहे. |

४) **श्री. राकेश येरगुडे, कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर जनसुनावणीबाबतची माहिती आमच्या पर्यंत पोहोचलेली नाही. शासनाच्या नियमानूसार ग्रामपंचायतीने पर्यावरणविषयक जनसुनावणीची माहिती ग्रामसभेद्वारे गावकऱ्यांना द्यायला हवी होती. याबाबत कुठलीही प्रक्रिया करण्यात आली नाही. ठराव केलेला नाही. आमचा ग्रामसेवकाच्या कार्यपद्धतीवर आक्षेप आहे. जाहीरातीमध्ये नमूद आहे की प्रकल्पाबाबतचे आक्षेप निखीत स्वरूपात देण्यात यावे. पर्यावरण विषय हा दुय्यम मुद्दा आहे. आमच्यासाठी आमच्या जमीनीचा मोबदला हा प्राथमिक व महत्त्वाचा मुद्दा आहे. आमचा या प्रकल्पाला विरोध नाही. सर्वप्रथम शेतकऱ्यांना प्रकल्पाबाबत माहिती द्यायला हवी होती. माझी मा. जिल्हाधिकारी यांना विनंती आहे की त्यांनी सर्वप्रथम शासनाच्या नियमानूसार शेतकऱ्यांच्या समस्या सोडवाव्या व त्यांनतर प्रकल्पाला परवानगी द्यावी. भूमिहीन होणाऱ्य शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्यात यावा व योग्य | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.११ मध्ये नमूद आहे. |

| | | |
|---|---|---|
| | तो रोजगार देण्यात यावा. कंपनीने मराठी भाषेमध्ये डीपीआर सादर करावा जेणेकरून सर्वांना डीपीआर वाचता येईल. जर मराठी भाषेत डीपीआर सादर केला असता तर इतके प्रश्न निर्माण झाले नसते. मा. जिल्हाधिकारी यांना विनंती आहे की ग्रामसेवकाची बदली करण्यात यावी. ग्रामपंचायतीने ना-हरकत प्रमाणपत्र देतेवेळी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची परवानगी/स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. मा. जिल्हाधिकारी यांना विनंती आहे की आमच्या समस्यांचे निराकरण करावे. | |

५) **श्री. गिरीधर कृष्णाजी उरकुडे, कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आतापर्यंत उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांना माझे समर्थन आहे. कंपनी प्रशासनाने फक्त आश्वासने दिली परंतु ती पूर्ण केलेली नाही. परंतु शेतकऱ्यांच्या नेमक्या काय समस्या आहेत याची माहिती कुणालाही. आज येथे इतका मोठा कार्यक्रम आपल्या उपस्थितीत पार पडत आहे परंतु कार्यक्रमाचर पार्श्वभूमी काय आहे हे आम्हा गावकऱ्यांना कळलेले नाही. सदर कार्यक्रमाची पूर्व कल्पना न देता सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याने शेतकऱ्यांमध्ये त्यांच्या जमीनी प्रकल्प प्रवर्तकाने घेतल्या की काय असे भितीचे वातावरण आहे. त्यामुळे माझी आपणांस विनंती आहे की सदर जनसुनावणी रद्द करण्यात यावी. जनसुनावणी घेण्यापूर्वी एसीसी कंपनी व शेतकऱ्यांची बैठक आयोजित करण्यात यावी व त्यानंतरच जनसुनावणी घेण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.११ मध्ये नमूद आहे. |

६) **श्री. मनोज मनोहर गिरडकर, कुरई, ता. वणी, जि. यवमताळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | खाणकामामुळे जैव विविधता नष्ट होणार आहे त्याबाबत कंपनी कोणत्या उपाययोजना करणार आहे. वायु प्रदूषण व जल प्रदूषणामुळे होणारे आजार टाळण्यासाठी काय उपाययोजना करणार आहे. स्थानिकांना रोजगार पूरविण्याबाबत कंपनीचे काय धोरण आहे. तसेच प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांबाबत कंपनीचे धोरण काय आहेत? | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.११ मध्ये नमूद आहे. |

| | | |
|---|---|---|
| | जमीन मुल्यांकन पद्धतीने घेणार आहे की वाटाघाटी पद्धतीने घेणार आहे. कंपनीची पार्श्वभूमी बघता कंपनीने अयोग्य पद्धतीने जनहीताचे कार्य केले आहे. कंपनीचा गोवारी खाण प्रकल्प सुरू आहे. परंतु गोवारी खाण कार्यान्वित करताना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता आजपावेतो केलेली नाही. सन २०१४ मध्ये गोवारी खाण प्रकल्पांकडून श्री. कासावार माजी आमदार यांच्या पुढाकाराने थोड्या फार प्रमाणात मोबदला दिला. कंपनीने आश्वासन दिले होते की दरवर्षी मोबदला देण्यात येईल परंतु त्याचा पाठपुरावा करून देखील कंपनीने त्याची पूर्तता केलेली नाही. अशा प्रकारची कंपनीची पार्श्वभूमी बघता या प्रकल्पाला परवानगी देण्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. गोवारी गावातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात ये-जा करण्यासाठी रस्ताच उपलब्ध नाही. दरवर्षी रस्ता बदलविण्यात येतो. गोवारीप्रमाणे या प्रकल्पात देखील अशीच परिस्थिती निर्माण झाली तर मला होणाऱ्या मानसिक त्रासाची भरपाई कोण करणार? | |

७) **श्री.भिवाकर निळकंठ झाडे, ग्रामपंचायत सदस्य कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर जनसुनावणीबाबत कुरई ग्रामपंचायतीला कसलीही माहिती देण्यात आली नसल्याचे आम्हाला कळले. कंपनी प्रशासन बाधित शेतकऱ्यांना मोबदला किती देणार, बेरोजगारांना रोजगार किती देणार तसेच पर्यावरणपूरक प्रकल्प उभारू शकत नाही याची मी हमी देतो. कारण आम्ही वारंवार सूचना देऊनही जवळच्या प्रकल्पामध्ये पर्यावरण विषयक उपाययोजना करण्यात येत नाही. सदर प्रकल्पामुळे भूजलाची पातळी खालावणार असून परिसरात पाण्याच्या टंचाईची समस्या निर्माण होईल. तसेच वायु प्रदूषणामुळे शेतीचे नूकसान होणार आहे. पाणी टंचाई रोखण्याकरिता शुद्ध पाणी पुरवठा योजना कंपनीने राबवावी. त्याकरिता पाणी शुद्धकरण टाकी उभारावी. बाधित शेतकऱ्यांना त्यांच्या मागणीनूसार मोबदला दिला पाहिजे. सदर जनसुनावणी रद्द करून ग्रामपंचायतीच्या परवानगी नंतरच जनसुनावणी घेण्यात यावी. पर्यावरण सुनावणी पूर्ण झाली तर कास्तकार काही करू शकणार | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.११ मध्ये नमूद आहे. |

| | | |
|---|---|---|
| | नाही. आमच्या समस्यांचे निराकरण केल्यानंतरच प्रकल्पास मान्यता देण्यात यावी. | |

८) **श्री. राकेश उमेशराव उपरे, कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सादरीकरणामध्ये ब्लास्टींगबाबत माहिती दिलेली नाही. तसेच वायु, जल व ध्वनी प्रदूषणाची माहिती दिलेली नाही. गोवारी खाण प्रकल्पालगत माझे गट नं. १७ मध्ये शेती आहे. ब्लास्टींगमुळे माझ्या शेतीमध्ये खाणीतील दगड पडतात. खाणीच्या सीमेला संरक्षण भिंत नाही त्यामुळे जनावरे खाणीच्च्या खड्ड्यात पडतात. खाण निदेशालयाच्या नियमांचे पालन करण्यात येत नाही. त्यामुळे ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी. शासनामार्फत शेतकऱ्यांसोबत संपर्क साधून त्यांच्या समस्या सोडवाव्या. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.११ मध्ये नमूद आहे. |

९) **सौ. स्वाती विजय झाडे, सरपंच, ग्रामपंचायत कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर जनसुनावणीबाबत कुरई ग्रामपंचायतीला कुठलेही पत्र प्राप्त झाले नाही. शेतकऱ्यांचे मत न जाणता व ग्रामपंचायतीची बैठक न घेता सदर जनसुनावणी घेण्यात येत आहे. शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला द्यावा. खाणकामामुळे भूजलाची पातळी खालावणार नाही याची कंपनीने दक्षता घ्यावी. पिण्याच्या पाण्याची सोय करून द्याव सदर जनसुनावणी स्थगित करून पुढे घेण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.११ मध्ये नमूद आहे. |

१०) **श्री. विजय झाडे, कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | शेतकऱ्यांना योग्य मोबदला दिला तरच शेतकरी दुसऱ्या ठिकाणी शेती विकसित करू शकणार. त्यामुळे माझी मागणी आहे की कुरई गावातील शेतकऱ्यांना योग्य दर मिळाला पाहिजे. तसेच ८०% स्थानिकांना प्रकल्पात | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.११ मध्ये नमूद आहे. |

| | | |
|---|---|---|
| | रोजगार मिळाला पाहिजे. माझी विनंती आहे की कंपनीने शेतकऱ्यांशी संपर्क साधून योग्य मार्ग काढावा. | |

११) **<u>प्रकल्प प्रवर्तकाने दिलेली उत्तरे:-</u>**

| अ. क्रं. | उत्तरे |
|---|---|
| १) | अदानी समूहातर्फे १४ गावे दत्तक घेतलेली आहे व सर्व १४ गावांमध्ये पायाभूत सूविधा जसे की शौचालये बांधून देणे, गावातील रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करण्यात आले आहेत. समुदाय हॉलची निर्मिती करण्यात आली. पिण्याच्या पाण्याची सुविधा पूरविण्यात आली आहे. शाळा आणि आंगणवाडीच्या सुविधा पुरविण्यात आली आहे. मागील एक वर्षाच्या काळात काही प्रमाणात बचत गटांना देखील मदत करण्यात आली असून त्यामुळे महिला सशक्तीकरण करण्यास मदत झाली आहे. शेतीसाठी थिबक सिंचनाची सुविधा देण्यात आली आहे. तसेच नदी, तलावांचे पुनरूज्जीवन करण्याबाबत देखील कार्य करण्यात आले आहे. कुरई मधील ८०% शेती संपादित करण्यात येईल व तेथे देखील उपरोक्त नमूद सोई सुविधा कुरई व लगतच्या गावांमध्ये पूरविण्यात येतील. याबाबत आपण सर्वांसोबत टप्प्या-टप्प्याने बैठका घेऊन व चर्चा करूनच पुढील प्रकिया करण्यात येईल. तसेच सामाजिक उत्तरदायित्व निधी बाबत देखील आपणासोबत चर्चा करून सर्व सोई सुविधा पूरविण्यात येतील. प्रकल्पामध्ये एकूण ६६ रोजगार निर्माण होणार आहे जे खाणकामाकरिता असणाार आहे. त्यामध्ये भूगर्भशास्त्रज्ञ, खाण उपकरणाची हाताळणी करणारे ऑपरेटर अशा प्रकारचे रोजगार आहेत. त्यामध्ये स्थानिक पातळीवर शैक्षणिक अर्हता प्राप्त झाल्यास स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. ज्याप्रमाणे एसीसी सिमेंट उद्योगात, गोवारी व सिंदोला खाणीमध्ये स्थानिकांना रोजगार देण्यात आला त्याचप्रमाणे या प्रकल्पात देखील रोजगार उपलब्ध करून देण्यात येईल. स्थानिकांना त्यांच्या कौशल्याप्रमाणे रोजगार उपलब्ध करून देण्यात येईल. अदानी फाऊंडेशनतर्फे कौशल्य विकास कार्यक्रम घेण्यात येईल व प्रशिक्षण केंद्रदेखील उभरण्यात येईल व रोजगाराच्या जास्तीत जास्त प्रमाणात संधी उपलब्ध करून देण्यात येईल ज्यामुळे स्थानिकांचे जीवनमान ऊंचावण्यास मदत होईल. कंपनी प्रशासन जमीनधारकांसोबत बैठक घेऊन जमीनीच्या मोबदल्याबाबत चर्चा करूनच खरेदी करतील. सद्य:स्थितीत जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया सुरू झालेली नाही. हवा प्रदूषण नियंत्रणात ठेवण्याकरिता पाण्याचे फवारे बसविण्यात येतील. वेट ड्रीलींग करण्यात येईल. टॅंकरद्वारे पाण्याची फवारणी करण्यात येईल. बॅग फिल्टर्स बसविण्यात येतील. रस्त्यांवर पाण्याचे फवारणी करण्यात येईल. खाणपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्यात येईल. मलनि:सारण प्रणाली बसविण्यात येईल. जमीनीच्या पाण्याची पातळी या परिसरात खूप चांगली आहे. भूगर्भातील पाण्याच्या पातळीमध्ये सुधारणा करण्याबाबत प्रयत्न करण्यात येतील. हायड्रोजीयोलॉजीकल सर्वेक्षण करण्यात येईल. जिल्हा प्रशासन व म.प्र.नि. मंडळकडून आवश्यक ते मार्गदर्शन घेण्यात येईल. तसेच शासनाच्या नियमांचे व म.प्र.नि. मंडळाच्या निर्देशांचे पालन करण्यात येईल. एसीसी तर्फे मागील वर्षी या परिसरामध्ये बंधारा बांधण्यात आला आहे. त्याबाबत राष्ट्रीय स्तरावर बातमी प्रकाशित करून कौतुक करण्यात आले. कोणताही निर्णय एकतर्फी घेण्यात येणार नाही. शासकीय नियमांनूसार जमीनीचा मोबदला देण्यात येईल. रोजगाराबाबतचा वार्षिक अहवाला शासनाकडे सादर करण्यात आले आहेत. |

१२) **श्री. राकेश उपरे, कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीचे म्हणणे आहे की सदर प्रकल्पात ६६ रोजगार उपलब्ध होती. परंतु सदर प्रकल्पात २५० लोकांची जमीन अधिग्रहीत करण्यात येणार आहे. कंपनीने स्थानिकांना कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध करून द्यावे. भूमि अधिग्रहण कायदा, २०१३ नूसार कंपनीने आमच्या जमीनी अधिग्रहीत कराव्यात. सदर कायद्यानूसार बाजारभावाच्या ४ पटीने जमीन अधिग्रहीत करण्याचे नमूद आहे. म्हणजेच जर जमीनीचा बाजारभाव २० लाख रूपये असेल तर त्या जमीनीचे ८० लाख रूपये प्रमाणे द्यावे. कंपनीने शाळा बांधलेल्या नाहीत. शाळेच्या इमारतीवर फक्त नाव बदलविलेले आहेत. राज्यमार्ग क्रं. २३६ ची अवस्था फार खराब झाली आहे. कृपया त्याची दुरूस्ती लवकरात लवकर करण्यात यावी. घुग्घूस शहराची जगाती सर्वात प्रदूषित शहरांमध्ये गणना होते. त्याचे प्रदूषण कमी करण्यासाठी एसीसीने उपाययोजना केलेल्या नाहीत. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.३६ मध्ये नमूद आहे. |

१३) **श्री. राकेश येरगुडे, कुरई, ता. वणी, जि. यवमताळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा प्रकल्पाला विरोध नाही. पर्यावरणाचा मुद्दा प्राथमिक नाही. जोपर्यंत स्थानिकांच्या मागण्या पूर्ण होत नाही तो पर्यंत प्रकल्प सुरू होऊ देणार नाही. स्थानिकांच्या जमीनी खरेदी केल्यावर त्यांन दुसऱ्या ठिकाणी स्थाईक होण्याकरिता उपयुक्त अशी रक्कम देण्याची बाब गांभीर्याने लक्षात घेतली पाहिजे. सर्वप्रथम जमीनीच्या मोबदल्याबाबत निर्णय घेण्यात यावा. त्यानंतरच प्रकल्पाला आवश्यक त्या गोष्टी जसे की वृक्षारोपण इ. मध्ये गावकरी सहकार्य करतील. रोजगारासंबंधी लागणाऱ्या कौशल्याबाबत आपण प्रकल्पाच्या अहवालामध्ये नमूद केले आहे काय? जर कंपनी आमच्या जागेवर काम करून नफा कमावणार असेल तर त्या नफ्यातून गावकऱ्यांना देखील मोबदला कंपनीने द्यायला हवा ही आमची मागणी आहे. प्रदूषणामुळे एखाद्या | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.३६ मध्ये नमूद आहे. |

| | | |
|---|---|---|
| | स्थानिकाला कर्करोगासारखा गंभीर आजाराची लागण झाली तर त्याच्या उपचाराचा खर्च कंपनी देणार काय? वायुप्रदषणामुळे शेतीचे नूकसान झाल्यास त्यांना वार्षिक मोबदला दिला नाही. ब्लास्टींग मटेरियल जमीनीच्या पाण्यात मिसळते व त्यामुळे पाणी प्रदूषित होते. सदर पाणी जमीनीमध्ये मुरून भूगर्भातील पाणी प्रदूषित होईल व पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत प्रदूषित होईल. | |

१४) **श्री. रोशन किरण, कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रकल्पामुळे शेतीचे नूकसान, आरोग्याचे नूकसान होईल. जोपर्यंत शेतकऱ्यांच्या मोबदल्याबाबत व रोजगाराबाबत निर्णय होत नाही तापर्यंत ही जनसुनावणी रद्द करावी. प्रकल्पग्रस्तांच्या सर्व गोष्टी मान्य झाल्यानंतरच प्रकल्प कार्यान्वित होईल अन्यथा प्रकल्प कार्यान्वित होणार नाही. सदर जनसुनावणी पुढे ढकलण्यात यावी ही नम्र विनंती. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.३६ मध्ये नमूद आहे. |

१५) **श्री. राकेश ऊपरे, कुरई, ता. वणी, जि. यतवमाळ:-**

| अ. क्रं. | सूचना | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रकल्प १२०० एकर परिसरामध्ये पसरलेला असणार आहे. यातून अंदाजे रू ७८६०/- कोटी रूपयांचा महसूल राज्य शासन व केंद्र शासनाला मिळणार आहे. म्हणजे प्रति एकर रू ६.० कोटी प्रमाणो शासनाला महसूल प्राप्त होणार आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की शासनाप्रमाणे शेतकऱ्यांना देखील रू. ६.० कोटी प्रति एकर प्रमाणे मोबदला देण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.३६ मध्ये नमूद आहे. |

१६) **श्री. लोकेश्वर वामन बोबडे, सिंदोला, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मागील चार पिढ्यांपासून आम्ही या परिसरात योती करत आहोत व शेतीवरच आमची उपजिविका आहे. आज | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.३६ मध्ये नमूद आहे. |

| | | |
|---|---|---|
| | प्रकल्पाच्या अहवालाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले की, आमची शेती अधिग्रहीत होणार आहे. आमच्या जमीनीचा योग्य तो मोबदला सिंदोला ग्रामवासीयांना देखील देण्यात यावा. शेतकऱ्यांसोबत करारनामा झाल्यानंतरच जनसुनावणी घेण्यात यावी. सदर प्रकल्पामुळे शेतकरी बेरोजगार होईल तसेच शेतमजूर देखील बेरोजगार होतील. याच परिसरात सिमेंट उद्योग कार्यान्वित करण्यात यावा जेणेकरून फक्त ६६ लोकांनाच नाही तर ४००० ते ५००० लोकांना प्रकल्पात रोजगार मिळू शकतो. परिसरात ८व्या वर्गापर्यंतच शिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे. परंतु कंपनीच्या कामगाराकडून व प्रकल्पग्रस्तांकडून घेण्यात येणाऱ्या फीमध्ये तफावत आहे. सदर शाळेमध्ये किमान १२ वी पर्यंतचे शिक्षण देण्यात यावे च शक्यतो पदवी पर्यंतच्या शिक्षणाची सोय कंपनीने या परिसरामध्ये करून द्यावी ही आमची मागणी आहे. कंपनीने शाळकरी मुलांसाठी बसची सुविधा उपलब्ध करून द्यावी. सिंदोला गावामध्ये खाण प्रकल्प सुरू झाल्यामुळे पाण्याची पातळी कमी झाली आहे. त्यामुळे कंपनीला विनंती आहे की त्यांनी उर्वरित जमीन अधिग्रहीत करून त्याचा योग्य तो मोबदला देण्यात यावा. कंपनीच्या प्रदूषणामुळे होणाऱ्या नूकसानीबाबत कंपनीने फक्त एकदाच रू. ८० लाखची नूकसान भरपाई दिलेली आहे. त्यानंतर नूकसान भरपाई कंपनीने दिलेली नाही. एसीसी कंपनी कार्यान्वित असताना सामाजिक उत्तरदायित्व निधी योग्यरित्या वापर होत होता. परंतु अदान समुहाकडे हस्तांतरीत झाल्यापासून मागील २ वर्षात सामाजिक उत्तरदायित्व निधीचा वापर करण्यात आला नाही. परिसरामध्ये कंपनीचा दवाखाना आहे परंतु तेथे फक्त किरकोळ आजारावर उपचार होतात व त्याचा फायदा कंपनीतील कामगारांच्या परिवारासाठीच होते. आमची मागणी आहे की या परिसरामध्ये एक सुपरस्पेशालिटी दवाखान्याची सुविधा देण्यात यावी जेणेकरून गंभीर स्वरूपाच्या रोगांवर उपचार करणे शक्य होईल. कंपनीला जवळपास ५० वर्षे झालेली आहेत. कंपनीच्या किती खाणी सुरू आहे व किती बंद आहेत याची माहिती द्यावी. सिंदोला गावाला कंपनीतर्फे पाण्याची सुविधा देण्यात येत आहे. सदर कंपनीमध्ये रोजगार देताना स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे. तसेच ज्या स्थानिकांना कंपनीमध्ये बाहेरगावी नौकरी दिलेली आहे त्यांची बदली गावामध्ये या प्रकल्पात करण्यो यावी. या सर्व मागण्या पूर्ण | |

| | | |
|---|---|---|
| | करण्याचे लेखी आश्वासन कंपनीने दिल्यानंतरच जनसुनावणी घेण्यात यावी ही विनंती. यवतमाळ जिल्ह्यातील ८०% महसूल हा या परिसरातून मिळतो त्यामुळे या परिसरातील रस्त्यांची दुरूस्ती करण्यात यावी. रस्त्यांची वहन क्षमता वाढविण्यात यावी जेणेकरून रस्ते खराब होणार नाहीत. या समस्येकडे प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे व रस्ते बांधण्याकरिता जास्त प्रमाणात निधी उपलब्ध करून द्यावा. सदर परिसरामध्ये १०-१२ उद्योग कार्यरत आहेत. | |

१७) <u>श्री. आयुष ठाकरे, कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर अहवाल हा खोटा असून गावकऱ्यांची फसवणूक करणारा आहे. सदर अहवालामध्ये ८५ गावे प्रकल्पबाधित असल्याचे दर्शविले आहे परंतु त्यांची नावे अहवालामध्ये दर्शविलेली नाहीत. याबाबत केंद्र शासनाला खोटा अहवाल सादर करण्यात आला आहे. खोटा अहवाल सादर करणाऱ्या व्यक्तिवर कारवाई करण्यात याची जेणेकरून पुढील प्रकल्पांमध्ये खोटे अहवाल सादर होणार नाहीत. २ किमी क्षेत्रामध्ये असणाऱ्या<br>शेतीमध्ये वायु प्रदूषणाचा त्रास होणार आहे. त्याकरिता कंपनी पाणी फवारणी करावी. तसेच पाणी फवारणी न केल्यास कंपनीने नूकसान भरपाई द्यावी. संबंधित शेतकऱ्यांना व गावकऱ्यांना न्याय मिळवून दिल्यानंतरच सदर जनसुनावणी घेण्यात यावी. नकोडा ते सिंदोला दरम्यान असलेल्या कन्व्हेअर बेल्टमुळे ध्वनी प्रदूषण होत आहे. सदर ध्वनी प्रदूषणावर नियंत्रण करण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.३६ मध्ये नमूद आहे. |

१८) <u>श्री. संतोष लक्ष्मण झाडे, सिंदोला, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | एसीसी कंपनीद्वारे मला मागील ३-४ वर्षापासून रोजगार मिळाला आहे. तसेच या परिसरातील बहूतेक महिलांना अप्रत्यक्षपणे रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यात याव्या. गोवरी खाणीला भेट देण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.३६ मध्ये नमूद आहे. |



182

१९) **श्री. मोरेश्वर येरगुडे, कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या परिसरात ५ कि.मी. अंतरावर स्थित असलेल्या गोवारी खाणीमध्ये कोणत्याही प्रकारचे प्रदूषणाचे नियम पाळण्यात येत नाहीत. याबाबत शेतकऱ्यांचे मनोगत ऐकता येईल. याबाबत माजी आमदार श्री. कासावार यांच्यामार्फत पाठपुरावा करण्यात आला व त्यानंतर शेतकऱ्यांच्या प्रदूषणाच्या समस्या सोडविण्यात आल्या. शेतकऱ्यांचे मनोगत कंपनी जाणून घेत नाही. शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला देण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.३६ मध्ये नमूद आहे. |

२०) **सौ. यमुना पाटील, मुंगोली, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | शेतकऱ्यंनी त्यांच्या समस्या व्यवस्थित मांडाव्यात. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.३६ मध्ये नमूद आहे. |

२१) **सौ. अल्का खोब्रागडे, कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे शेतकऱ्यांना समर्थन आहे. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.३६ मध्ये नमूद आहे. |

२२) **सौ. सुनिता रामदास काकडे, कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | एसीसी तर्फे गावातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविली आहे. तसेच महिला सशक्तीकरणासाठी मदत केली आहे. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.३६ मध्ये नमूद आहे. |

२३) <u>कु. कल्याणी बबन खामनकर, कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | एसीसी तर्फे माझ्या गावात सीएसआर अंतर्गत बरेच कार्य करण्यात आले आहेत. सीएसआर अंतर्गत शाळेचे काम केले आहे. पिण्याच्या पाण्याची सोय केलेली आहे. माझे या प्रकल्पाला पूर्ण समर्थन आहे. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.३६ मध्ये नमूद आहे. |

२४) <u>सौ. स्वाती विजय झाडे, सरपंच, कुरई ग्रामपंचायत, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सर्वप्रथम शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यात याव्या व नंतर सीएसआर निधीबाबत चर्चा करण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.३६ मध्ये नमूद आहे. |

२५) <u>सौ. गीता आगलावे, कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथे शेतकऱ्यांचे प्रश्न सर्वप्रथम सोडविण्यात यावे व त्यानंतरच बाकीच्या विषयांबाबत चर्चा करण्यात यावी. कारण आमची जमीन अधिग्रहीत होणार आहे. येथे उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांवर तोडगा काढण्यात यावा. गावातील रस्त्यांची दुरूस्ती करण्यात यावी. गावातील शाळांमध्ये शिक्षक नेमण्यात यावेत. शाळांमध्ये शिक्षक नसल्यामुळे मुलांना बाहेरगावी शिक्षणासाठी पाठवावे लागते. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.३६ मध्ये नमूद आहे. |

२६) <u>श्री. व्ही. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, हैदराबाद:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्प प्रवर्तकांनी आवश्यक त्या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा उभाराव्यात, शेतकऱ्यांच्या समस्या सोडवाव्यात. पर्यावरण व पर्यावरणीय संतुलन जोपासणे महत्त्वाचे आहे. प्रशासनाने प्रदूषण नियंत्रणाची जबाबदारी घेतल्यास वाद निर्माण होणार नाहीत. प्रशासनाने शेतकऱ्यांना जास्तीत जास्त प्रमाणात | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.३६ मध्ये नमूद आहे. |

| | | |
|---|---|---|
| | मोबदला मिळेल याची खात्री द्यावी. स्थानिकांना रोजगारात प्राधान्य द्यावे. पर्यावरण सुरक्षा देखील महत्त्वाची आहे. | |

**२७) श्री. मनोज काळे, कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर जनसुनावणी स्थानिक शेतकऱ्यांना विश्वासात न घेता आयोजित करण्यात आल्यामुळे ही जनसुनावणी स्थगित करण्यात यावी. जमीन अधिग्रहणाबाबत शेतकऱ्यांना एकही सूचनापत्र देण्यात आले नाही. ज्या शेतकऱ्यांची जमीन अधिग्रहीत करण्यात येणार आहे त्यांना सूचनापत्र देण्यात यावे व त्यंची ग्रामपंचायतमार्फत बैठक घेण्यात याची. या परिसरामध्ये सिमेंट उत्पादन प्रकल्प उभारण्यात यावा जेणेकरून यवतमाळ जिल्ह्यातील कच्चा माल इतर जिल्ह्यांमध्ये पाठवावा लागणार नाही. तसेच स्थानिकांना रोजगारदेखील प्राप्त होईल. जेव्हापासून अदानी समूहाकडे हस्तांतरण झाले आहे तेव्हापासून कमचाऱ्यांना १२ तास काम करण्याची सक्ती करण्यात आली आहे. गोवारी खाणीमध्ये प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमानूसार जमीनीचे सपाटीकरण केलेले नाही. चणाखा येथील खाण खड्ड्यातील पाणी पिण्यास अयोग्य असल्याचा अहवाल निरी या संस्थेने दिला होता. परंतु सदर कंपनी चणाखा येथील अशुद्ध पाणी सिंदोला गावातील लोकांना देत आहे. सदर प्रकलपातर्फे सभोवतालच्या गावात कुठलाही विकास करण्यात आलेला नाही. माझी विनंती आहे की ही जनसुनावणीला शेतकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण केल्याशिवाय मान्यता देण्यात येऊ नये. सदर प्रकल्पामुळे जवळपास ३००० ते ३५०० लोक विस्थापित होणार आहेत. त्या विस्थापित लोकांसाठी प्रकल्प प्रवर्तक काय उपाययोजना करणार आहेत याची माहिती देण्यात यावी. तसेच सिमेंट उत्पादन करणारा उद्योग वणी तालुक्यात सुरू करण्यात यावा अशी माझी मागणी आहे. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.३६ मध्ये नमूद आहे. |

२८) **श्रीमती नंदा सुरेश पोयाम, कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यात याव्या. शेतकऱ्यांसोबत आम्हाला देखील मोबदला देण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.३६ मध्ये नमूद आहे. |

२९) **सौ. चंद्रकला राजूरकर, अहेरी-बोरगांव, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझी गट नं. १४२ मध्ये कुली येथे शेती आहे. जनसुनावणीची एकही नोटीस ग्रामपंचायतीला देण्यात आली नाही. येथे जनसुनावणीची व्यवस्था व्यवस्थित केलेली नाही. जमीनीच्या मोबदल्याच्या दराची घोषणा करण्यात यावी. वाहतूकीच्या रस्त्याची दुरूस्ती करण्यात यावी. रस्त्याची देखभाल दुरूस्ती करण्यात येत नाही व त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढलेले आहेत. रोजगार प्रति एकराप्रमाणे देण्यात यावा. शैक्षणिक अर्हतेनूसार रोजगार देण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.३६ मध्ये नमूद आहे. |

३०) **श्री. दिनकर पावडे पाटील, प्रदेश उपाध्यक्ष, भाजपा किसान मोर्चा, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | उपरोक्त विषयास अनुसरून मौजा कुरई, कुली, सिंदोला, ता. वणी, जि. यवतमाळ येथील लाईमस्टोन ब्लॉकची पर्यावरण विषयक जनसुनावणी आज रोजी मौजे कुरई येथील जिल्हापरिषद शाळेत सुरू आहे. या जनसुनावणीत कार्यकारी सारांश मध्ये ४८०.८० हेक्टर क्षेत्र व प्रकल्पाची किंमत ही ४९३.५ कोटी रूपये आहे असा उल्लेख आहे. चुनखडी उत्पादन क्षमता ३ दशलक्ष टन प्रतिवर्ष व एकूण उत्खनन ६.२९३ दशलक्ष टन प्रतिवर्ष पैकी ३ दशलक्ष टन प्रतिवर्ष कचरा ३.१७२ दशलक्ष टन प्रतिवर्ष आणि टॉपसॉईल ०.१२१६ दशलक्ष टन प्रतिवर्ष आहे आणि १५०० टन प्रतितास क्षमतेचा क्रशर आहे. प्रकल्पाच्या वर्णनामध्ये राज्य सरकारने एमएमडीआर अधिनियम १९५७ आणि त्यच्या सुधारणा (अधिनियम) आणि खनिज | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.३६ मध्ये नमूद आहे. |

लिलाव नियम २०१५ नूसार आवश्यक देय देऊन नियम या सुधारणेसह लिलाव मंजूर केले आहे. प्रकल्पात एकूण ४८०.८० हेक्टर क्षेत्रावर कुरई चुण्याच्या ब्लॉककरिता खाणपट्टा मंजूर करण्यासाठी एसीसी ला पासंतीचे बोलीदार म्हणून घोषित करण्यात आले. या ४८०.८० हेक्टर क्षेत्रापैकी ०.०२ हेक्टर हे सरकारी जमीन आहे २.९४ हेक्टर वनजमीन आहे आणि उर्वरित ४७७.६६ हेक्टर ही खाजगी जमीन आहे. आयबीएम, नागपूरने ३ दशलक्ष टन प्रतिवर्षच्या जास्तीत जास्त उत्पादन क्षमतेची खाण योजनेला मंजूरी दिली आहे. चुन्याच्या दगडाची माईनस चालविण्याबाबत काही बार्बीचा उल्लेख केला आहे. खाणपद्धत:- ८. पद्धतीने १) पर्यावरणाचे वर्णन सुक्ष्म हवामान डाटा ३ प्रकारे दाखविले, २) पाणी गुणवत्ता परिणाम- भूजल गुणवत्ता, पृष्ठभाग गुणवत्ता, ३) मृदा गुणवत्ता परिणाम, कोर झोन, बफर झोन, ४) पर्यावरण आणि जैवविविधता, परिणाम, ५) फ्लोरा आणि अभ्यासाच्या क्षेत्रातील प्राणी, सामाजिक आर्थिक अभ्याापरिणाम. अभ्यासाच्या क्षेत्राची प्रशासकीय रचना:- सामाजिक व्यवस्था:- साक्षरता, व्यवसाय आणि उपजीविका, प्राथमिक अभ्यास, वाहतूक अभ्यासाचे परिणाम:- वाहतूक. अपेक्षित पर्यावरणीय प्रभाव आणि कमी करण्याच्या उपाययोजना. हवाई पर्यावरण: ध्वनी पर्यावरण, पाणी पर्यावरण, जमीन पर्यावरणख जैविक पर्यावरण, सामाजिक आर्थिक वातावरण, खाण कचरा, वाहतूकीमुळे होणारे परिणाम, असे आठ प्रभावित पर्यावरण देखरेख कार्यक्रम, अतिरिक्त अभ्यास, प्रकल्प लाभ, पर्यावरण व्यवस्थापन योजना.

निस्कर्ष:- अशाप्रकारे सकारात्मक टिप्पणीवर निष्कर्ष काढला जाऊ शकतो की शासन उपाययोजना आणि पर्यावरण व्यवस्थापन योजनेच्या अंमलबजावणीनंतर प्रकल्पाच्या सामान्य ऑपरेशनचा पर्यावरणावर किमान परिणाम होईल असे दाखविले आहे, प्रत्यक्षात तसे नाही. मा. महोदय आपणांस विनंती करतो की, प्रकल्प प्रस्तावक मेसर्स एसीसी लिमिटेड यांनी पर्यावरण सल्लागार म्हणून परफेक्ट एन्व्हिशे सोलुशन्स प्रा.लि. (पी.ई.एस.एल) मान्यता प्राप्त सल्लागार म्हणून संस्थेची निवड करून आठपानी कुरई लाईमस्टोन ब्लॉक करिता कार्यकारी सारांश तयार केला आहे. परंतु प्रत्यक्षात वस्तुस्थितीनूसार नाही. हा अहवाल कित्येक वर्षे १५ वर्षापुर्वीच्या

| | | |
|---|---|---|
| | आाराखड्यावरून केलेला प्रकल्पात प्रभावित होणाऱ्या बाबींचा समावेश केला आहे. पर्यावरण विषयक जनसुनावणी ही सन २०२४ मध्ये होत आहे. वर्तमान स्थितीला अनुसरून पर्यावरण विषयक जनसुनावणीत जो कार्यकारी सारांश विविध विभागास दिला आहे तो वर्तमा स्थितीस धरून नाही. आपणांस विनंती करतो की पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी रद्द करण्यात यावी. | |

३१) **श्री. प्रशांत झाडे, शेतकरी, कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या परिसरात माझी शेती आहे. सदर प्रकल्पामध्ये जमीनी जाणार आहेत परंतु त्याचा मोबदला अजून ठरलेला नाही. कुरई गावातील जवळपास ८०टक्के जमीन प्रकल्पात जाणार आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात स्थानिकांना रोजगार कसा उपलब्ध केला जाईल. कंपनीचे अधिकारी शासकीय अधिकारी व गावकरी यांच्यामध्ये बैठका घेऊन मोबदला ठरवण्यात यावा. गोवारीमध्ये कंपनीने प्रदूषण नियंत्रण उपाययोजना केलेली नाही. प्रकल्पाचा अहवाल हा मराठी भाषेमध्ये सादर करण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.३६ मध्ये नमूद आहे. |

३२) **श्री. संजय पुरूषोत्तम निखाडे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पाचा अहवाल मराठी भाषेमध्ये सादर करण्यात यावा व त्यानंतरच नव्याने जनसुनावणी घेण्यात यावी. शेतकरी संभ्रमात आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष दिले नाही. या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. त्यामुळे सदर जनसुनावणी स्थगित करण्यात यावी व पुढील तारीख देण्यात यावी. पुढील जनसुनावणी घेतेवेळी परिसरातील सर्व ग्रामपंचायती व शेतकऱ्यांना विश्वासात घेण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.३६ मध्ये नमूद आहे. |

३३) **श्री. विश्वास नांदेकर, माजी आमदार, वणी विधानसभा क्षेत्र, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | देशात असंख्य प्रकल्प शेतीवर अवलंबून आहेत. राजस्थान, छत्तीसगढ, मध्यप्रदेश या राज्यांमध्ये अशा प्रकारचे प्रकल्प आहेत. कंपनी प्रशासन दबाव टाकून जनसुनावणी घेण्यात आहे असे निदर्शनास येत आहे. सदर चुनखडी ब्लॉकचे आवंटन सुरूवातीला एसीसीला करण्यात आले व त्यांनतर एसीसी कंपनी अदानी समुहाकडे हस्तांतरीत झाली. सदर परिसरामध्ये वाघाचे अस्तित्व आहे. परंतु अहवालामध्ये त्याचा उल्लेख नाही. ब्लास्टींगमुळे परिसरातील वाघ पळून जातील. येथे क्रशर उभारण्यात येणार असून क्रश केलेला दगड रस्त्यांद्वारे घुग्घूस येथील सिमेंट प्लांट मध्ये पाठविण्यात येणार आहे. कंपनीने स्वतःचा वाहतूकीचा रस्ता तयार करावा किंवा कन्व्हेअर बॅल्टद्वारे वाहतूक करावी जेणेकरून प्रदूषण कमी प्रमाणात होईल. शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण केल्या पाहिजे. गावांमध्ये शाळा, महाविद्यालये, सांस्कृतिक भवन या सारख्या सुविधा पूरविण्यात याव्यात. तसेच प्रत्येकाला रोजगार मिळाला पाहिजे. त्यापूर्वी जमीनीचा दर निश्चित करण्यात यावा. शेतकऱ्यांनी जो दर मागायचा तो मागावा. महिलांना देखील रोजगार मिळाला पाहिजे. प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे आम्ही वारंवार तक्रारी केल्या परंतु काही कारवाई करण्यात येत नाही. पिण्याचे पाणी खराब केले. नदीचे प्रवाह बदलले, कोळसा खाणीच्या शेजारी राहणाऱ्या लोकांना त्वचेचे आजार झाले. कंपनीने लोकांचे आरोग्य खराग करायचे आणि सामाजिक संघटनांनी आरोग्य शिबीरे घ्यायची काय? कंपनीने आरोग्य शिबीरे घ्यावी. जवळपास ८०टक्के रॉयल्टी ही वणी क्षेत्रातून शासनाला मिळते. रॉयल्टी च्या रकमेतून रस्त्यांचे बांधकाम करण्यात यावे. जिल्ह्याचे पालकमंत्र्यांनी जनतेच्या समस्या सोडवाव्यात. सदर प्रकल्पाच्या अहवालामधील त्रुट्या दूर करून जनसुनावणी पुन्हा घेण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.३६ मध्ये नमूद आहे. |

३४) **श्री. मनोज खिरटकर, कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीतर्फे सांगण्यात आले की सर्वांच्या समस्या सोडविण्यात येतील. शेजारच्या गोवारी खाणीमुळे तेथील शेतकऱ्यंचे नूकसान झाले आहे तर त्यांना प्रकल्प प्रवर्तक मोबदला देणार आहेत काय? माझा स. नं. ३८/२ आहे. माझे शेत कंपनी विकत घेणार आहे काय? कंपनी जमीन टप्प्या टप्प्याने अधिग्रहीत करणार आहे किंवा एकत्र अधिग्रहीत करणार आहे याची माहिती देण्यात यावी. शेतकऱ्यांनी फक्त मोबदल्याकडे लक्ष न देता पर्यावरण संगोपनाकडे देखील लक्ष दिले पाहिजे. कंपनीने ४००० झाडे लावली होती ती दाखविण्यात यावी. फक्त मोबदला मिळून काहीच साध्य होत नाही. पर्यावरणचा देखील विचार करावा. कैमूर प्रशिक्षण केंद्रामध्ये फक्त राजकीय पार्श्वभूमि असलेल्यांनाच नौकरी लागली. मा आ. श्री. सुधीर मुनगंटीवार यांचे ४ कोटी वृक्ष लागवडीचे ध्येय होते. वृक्ष असतील तरच वातावरणात प्राणवायु मिळणार व वन्यजीवांचे संवर्धन होईल. वृक्ष तोडीमुळे पावसाचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे विविध आजाराचे प्रमाण वाढले आहे. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.३६ मध्ये नमूद आहे. |

३५) **श्री. राहूल झट्टे, उम्मीद बहुउद्देशीय संस्था, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वायु प्रदूषणामुळे होणारी समस्या वर उपाय<br>वणी परिसरात आणि वणीच्या आजूबाजूला सिमेंट कंपन्या डोलामाईट कंपन्या कोळसाच्या फॅक्टरी आणि कोळस उत्खनन अशा विविध कामात प्रचंड असा वायु प्रदूषण होतो. त्यावर कोणतीच उपायोजना आपल्याकडे उपलब्ध नाही, किंवा असेतल तर ते आपण अमंलात आणली नाही, किंवा जर या दोन्ही गोष्टी असेल तर आपण काटेकोरपणे त्याच्यावर लक्ष दिलं नाही आणि डोळे झाकून लोकांच्या जिवाशी खेळून राहिलोय.<br>मियावाकी वृक्ष लागवड:-<br>मियावाकी वृक्ष लागवड करताना जे वृक्ष लागवड करतात ते अनुभवहीन असल्यामुळे आणि त्यांना लागवडीचे | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.३६ मध्ये नमूद आहे. |

| | | |
|---|---|---|
| | अपूर्ण ज्ञान असल्यामुळे कुठेतरी अपयशी ठरते, आणि जेवढ्या प्रमाणात झाडे जगली पाहिजे ती जगत नाहीत. शेतकरी हे त्यांच्याशी त्यांच्या शेताच्या बांधावर जी वृक्ष लागवड करतात यात नवीन वृक्ष लागवड आणि जी जूनी झाडे लावलेली आहेत त्याची कोणतीही कार्बन क्रेडीट दखल न घेता ती सर्रास कापण्यात येते. यावर काय उपाययोजना आहे. कार्बन क्रेडीट सारख्या गंभीर मुद्यावर चर्चा करून शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात तयार होणाऱ्या ऑक्सिजनचे मूल्यमापन करून कार्बन क्रेडीटचा मोबदला सीएसआर फंडातून कसा मिळेल याच्याबाबत सविस्तर चर्चा शसकीय स्तरावर करण्यात यावी. आपल्या जिल्ह्यामध्ये अनेक बहुउद्देशीय संस्था आहेत. या संस्थांना सीएसआर मार्फत विघटनाचे कार्य जर दिले गेले तर अनेक होतकरू तरुण बेरोजगारांना यातून रोजगार उपलब्ध होऊ शकतो त्याच्यावर सुद्धा मा. जिल्हाधिकारी यांनी विचार करावा. | |

**३६) <u>प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली उत्तरे:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न |
|---|---|
| १) | MMDRA कायदा, १९५७ नूसार आम्हाला सदर ब्लॉक आवंटीत झाला आहे. शासनाच्या, म.प्र.नि. मंडळाच्या व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्व नियमांचे आम्ही पालन करत आहोत. पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि. १४/०९/२००६ रोजीच्या अधिसूचनेनूसार सदर जनसुनावणी घेण्यात येत आहे. आपल्या सूचनांची नोंद घेण्यात आली आहे. आपल्या सूचनांमध्ये जमीन अधिग्रहण, रोजगार व सोई सुविधांबाबत समस्या पर्यावरण मंजूरी मिळेपर्यंत सर्व समस्या सोडविण्या जातील. जमीन अधिग्रहणाच्या प्रक्रियेला आणखी बराच कालावधी आहे. त्याअगोदर संमतीपत्र प्राप्त करणे व इतर विभागांकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे शिल्लक आहेत. |

**३७) <u>श्री. राकेश येरगुडे, कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सर्वप्रथम जमीनीचा मोबदला जाहीर करा त्यानंतरच पर्यावरणावर आश्वासन द्या. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सर्व जमीनधारकांसोबत बैठक घेऊन जमीनीचा दर ठरविण्यात येईल व त्यानूसारच जमीन अधिग्रहीत करण्यात येईल. परंतु जमीन अधिग्रहण प्रक्रियेला सुरूवात होण्यास बराच कालावधी आहे. |

३८) <u>डॉ. पंकज आशिया, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती, जि. यवतमाळ:-</u>

| अ. क्रं. | सूचना |
|---|---|
| १) | आपल्या सर्व मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. कृपया वारंवार एकच मुद्दा मांडू नये. नवीन मुद्दा असल्यास तो मांडण्यात यावा. |

३९) <u>एक नागरीक, कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ग्रामपंचायतीला जनसुनावणीबाबत कोणीही माहिती दिली नाही. कास्तकार, गाव आणि प्रशासन हा महत्त्वाचा मुद्दा आहे. माझी कळकळीची विनंती आहे की येथे राजकारण करण्यात येऊ नये. शेतकऱ्यांची जमीन अधिग्रहीत होणार व भविष्यात प्रदूषणाचा त्रास आम्हाला होणार आहे. जनसुनावणी रद्द करण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

४०) <u>श्री. भाऊजी मारोती गौरकार, सिंदोला, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमची सिंदोला येथील जमीन माहूर संस्थानची आहे. जवळपास १८०० एकर जमीन आहे व २००-३०० वर्षांपासून शेती करत आहेत. सदर जमीन आमच्या मालकी हक्काची नाही. आमच्या गावातील ८६ हेक्टर जमीन अधिग्रहीत होणार आहे व त्यामुळे ७० कुटुंब बाधित होणार आहेत. कुरई, कुरली गावाप्रमाणेच सिंदोला वासीयांना मोबदला देण्यात यावा, ही विनंती. प्रकल्पग्रस्तांना २ एकरावर १ नौकरी याप्रमाणे रोजगार देण्यात यावा. त्यांच्या कौशल्य व शिक्षणानूसार रोजगार देण्यात यावा. शाळेत जाण्याकरिता बसची सुविधा पूरविण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

४१) **श्री. रामदास बटाले, कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या परिसरामध्ये बऱ्याच जनसुनावण्या झाल्या परंतु जनतेला त्यांचा अधिकार मिळाला नाही. जनसुनावणीदरम्यान फक्त आश्वासने दिली जातात परंतु त्याची पूर्तता करण्यात येत नाही. जनसुनावणी रद्द करण्यात यावी व परत घेण्यात यावी. कंपनीने दिलेली आश्वासने पूर्ण केली तर त्यांना जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागणार नाही. येथे जनसुनावणीला उपस्थित ७०% लोक शेतकरी व शेतमजूर आहेत. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

४२) **श्री. आशिष फुलसंगे, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर जनसुनावणी रद्द करण्यात यावी. प्रकल्प प्रवतकांनी सांगितल्याप्रमाणे जमीनीचा दर शेतकऱ्यांसोबत चर्चा करून निश्चित करण्यात यावा. आरसीसीपीएलच्या प्रकल्प प्रवर्तकाने जी आश्वासने दिली होती ती आजपर्यंत पूर्ण करण्यात आलेली नाहीत. त्याचप्रमाणे एसीसीतर्फे शेतकऱ्यांवर अन्याय होईल. प्रकल्प प्रवर्तकाने २०१७ च्या एका प्रकरणात आजपर्यंत मोबदला दिला नाही. सदर जनसुनावणी दरम्यान जमीनीच्या दराची घोषणा प्रकल्प प्रवर्तकाने करावी. सदर खाणीकरिता जमीन अधिग्रहण दलालांमार्फत करण्यात येऊ नये. जमीनधारकांसोबत थेट संपर्क साधण्यात यावा. जेणेकरून शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही. रस्त्यांच्या वाहतूकीची समस्या सोडविण्यात यावी. अपघातांचे प्रमाण वाढले आहे. रस्त्यांच्या वाहतूकीची क्षमता वाढविण्यात यावी. सीएसआर निधीचा व्यवस्थितरीत्या वापर करण्यात येत नाही. यदर प्रकल्पामध्ये प्रकल्पग्रस्तांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. स्थानिकांना देखील ८०% रोजगार उपलब्ध करावा. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

४३) **सौ. वनिता मेडावार, कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | रस्ता उपलब्ध नाही. तो उपलब्ध करून द्यावा. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

४४) **एक नागरीक, कुरई, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | शेतकऱ्यांची जमीन रू १.० कोटी प्रति एकर दराप्रमाणे अधिग्रहीत करावी. सदर प्रकल्पामुळे सुमारे २५०० लोक प्रभावित होणार आहेत. परंतु एसीसीने याबाबत अहवालात नमूद केले नाही. प्रकल्प प्रवर्तकाने रोजगार देताना राजकीय दबावाला बळी पडु नये. भारत सरकारने स्थानिकांच्या समस्या सोडवाव्या. सिलीकॉन व कॅल्शियम या रसायनांमुळे श्वसनाच्या समस्या उद्भवतात. कंपनीने जागतिक स्तराच्या आरोग्य सुविधा पूरवाव्यात. सदर प्रस्तावित प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे ५ किमी त्रिज्येतील क्षेत्रामध्ये ऱ्हास होणार आहे. कंपनीने आजच्या महागाईच्या दराचा विचार करून मोबदला द्यावा. सदर प्रकल्पामुळे आजपर्यंत ३ व्यक्तिंना त्यांचे प्राण गमवावे लागले आहेत. सीएसआर निधीचा लाभ कंपनीतील कामगारांनाच मिळाला आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

४५) **श्री. विजय आनंदराव पिदूरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रस्तावित कुरई माईन येथे उत्खननात उत्पादन ६.२९३ दशलक्ष टन प्रति वर्ष त्यात ३ दशलक्ष टन प्रतिवर्ष लाईमस्टोन आहे. उर्वरित ३.१७२ दशलक्ष टन प्रतिवर्ष त्यामध्ये कुठले खनिज आहे. याबाबत खुलासा करावा. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |
| २) | ४८० हेक्टरपैकी २०० हेक्टर जमीन उत्खननानंतर बॅकफिलींग करणार त्या जमीनीचा उपयोग काय करणार आहे. लीज संपल्यावर जी जमीन मूळ मालकांना परत देणार का? त्याची माहिती द्यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ३) | खाणकामातील १२८ हेक्टर जमीनीत पाणी साठविणार त्याचा उपयोग त्याबाबत सेंट्रल ग्राऊंड वॉटर रिसोर्स बोर्ड (CGWRB) परवानगी घेतली आहे का? | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |
| ४) | खाणक्षेत्रात ३५ हेक्टर डंप एरिया दाखविला तो एकाच ठिकाणी ही वेगवेळा याची माहिती द्यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |
| ५) | खाण प्रकल्पामुळे लोकांचे जीवनमान सुधारणार असे सांगितले याबाबत आजची परिस्थिती व खाण उद्योग नंतर सुधारणा याबाबत अभ्यास केला आहे का? याचे स्पष्टीकरण द्यावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |
| ६) | प्रस्तावित ४८० हेक्ट क्षेत्रामध्ये ०.२ टॉप सॉईल दाखविली याला आधार काय? पर्यावरण संवर्धनासाठी बांबू, बाभूळ, वड, पिंपळ, करणृ कडुलिंब, वृक्ष लागवड करावे. जमीनीचा प्रकार ०.२ टॉप सॉईल दाखविले त्यात लावलेली वृक्ष कशी वाढणार याची माहिती द्यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |
| ७) | कुरई लीज परिसरात जवळील नैसर्गिक नाले बोर यांतील पाणी उत्खननामुळे कमी होणार याची उपाययोजना रिपोर्ट मध्ये नाही. या बद्दल माहिती द्यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |
| ८) | प्रस्तावित खाणीमुळे एस.सी., एस.टी., ओ.बी.सी. गरीब समुहावर होणाऱ्या परिणामाचा सर्वे करणे अपेक्षित परंतु रिपोर्टमध्ये नाही. याचे स्पष्टीकरण द्यावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |
| ९) | लाईमस्टोन उत्खनन व दळण वळण यामधून उडणाऱ्या धुळीकणामुळे रस्त्यालगत व परिसरात पिकाच्या पानावर फुलोऱ्यावर धूळ साचल्याने फुलगळ परिणाम उत्पादन क्षमता कमी होते ही नूकसान नैसर्गिक नसून मानवनिर्मित याकरिता बाजारभावाप्रमाणे कंपनीकडून भरपाई देण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |
| १०) | खाण उत्खनन दरम्यान (Influant) ग्रिस, ऑईल, वंगन इत्यदी घटकांमुळे पाणी प्रदूषित होणार यासाठी ट्रिटमेंट प्लँटची आवश्यकता याबाबत माहिती नाही ती द्यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |
| ११) | कुरई खाणीतील खनिज विविध खरीददारांना विकून राज्य मार्ग २३६ द्वारे वाहतूक करण्यात ययेईल परंतु वाहनातील खनिज भार क्षमता नूसार तो वाहून नेण्याची क्षमता रस्त्यात आहे का? नसेल तर भार क्षमतेनूसार क्षतीग्रस्त रस्ता कंपनी निर्माण करणार याची माहिती देण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |
| १२) | प्रस्तावित खाणीतील ६६ रोजगार देण्याची माहिती. यामध्ये ४८० हेक्टर मध्ये १८० जमीन धारक त्यावर अवलंबून असणारे शेतकरी व भूमिहीन बेरोजगार होणार यांच्या उदर्निर्वाह बद्दल कंपनी कोणती उपाययोजना करणार याचा खुलासा करावा. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| १३) | स्थानिक बेरोजगारोना राज्य शासनाच्या धोरणाप्रमाणे ८०% स्थानिकांना शैक्षणिक पात्रतेनूसार रोजगार देण्यात यावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |
| १४) | खाण उत्खनन दळण वळण मुळे निर्माण होणाऱ्या दैनंदिन प्रदूषण दर्शविणाऱ्या स्वयंचलित हवामापक यंत्र कंपनीकडून बसविण्यात येत नाही ते बसविण्यात यावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |
| १५) | खाणीकरिता जमीन भूसंपादन पुनर्वसन पारदर्शक हक्क अधिनियम २०१३ मधील २६ ते ३० सूचनेप्रमाणे चालु बाजारभाव प्रमाणे जमीन घेण्याची कार्यवाही करणार आहे का? याचा खुलासा करावा. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

४६) **ॲड. श्री. रूपेश गुणवंत ठाकरे, सरपंच, मुंगोली ग्रामपंचायत, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | नवीन प्रकल्पाच्या Boundary Line वर पर्यावरण पोषक वृक्षांची लागवड करावी जेणेकरून प्रकल्पाला लागून असलेल्या शेतकरी बांधवांना त्याचा त्रास होणार नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पहिल्या ५ वर्षांमध्ये ३ टियर वृक्षारोपण ४ हेक्टर क्षेत्रामध्ये केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे करण्यात येणार आहे. तसेच पुढे वृक्षारोपण ६० हेक्टर क्षेत्रापर्यंत वाढविण्याचे कंपनीचे उद्दीष्ट आहे. वृक्षारोपण करताना विशिष्ट प्रजातींबद्दल गावकऱ्यांसोबत चर्चा करून वृक्षारोपण करण्यात येईल. |
| २) | यदाकदाचित प्रकल्पाद्वारे शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे नूकसान झाल्यास त्याची नूकसान भरपाई देण्याची तरतूद करावी. | कोर झोन मध्ये खाणकाम करतेवेळी खाण सुरक्षा महानिदेशालय यांच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यात येईल. बफर झोनमधील शेतपिकांचे नूकसान झाल्यास उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असणाऱ्या समितीच्या आदेशानूसार योग्य ती नूकसान भरपाई देण्यात येईल. |
| ३) | कंपनीच्या बांधकामांच्या काळात व प्रकल्प सुरू झाल्यावरही प्राधान्याने स्थानिक युवकांना रोजगार देण्यात यावा. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |
| ४) | मेसर्स एसीसी कंपनीकडून भविष्यात लागणारे कौशल्यधारक मजूर बनविण्याकरिता लागणारे ट्रेड कंपनीद्वारे सुरू करून व्यावसायिक प्रशिक्षणाची व्यवस्था करून शिखित युवकांना सक्षम बनविण्याकरिता तरतूद करण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ५) | कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून प्रकल्पबाधित गावातील सरपंचाकडून मागणी केलेल्या कामांची पूर्तता प्रकल्प प्रवर्तकाकडून करण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |
| ६) | केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळा यांनी हवा, ध्वनी, वायु आणि जल प्रदूषणावर बनविलेल्या नियमावलींचे त्यांनी घालून दिलेल्या अटी व शर्तींचे पालन करून प्रकल्प सूरू करण्यात यावा. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

**४७) <u>श्री. अजय धोबे, जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड, जि. यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | शेतकऱ्यांनी व लोकप्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे या ठिकाणी देण्यात यावी. सदर अहवाल खेटा असल्याचे येथे लोकप्रतिनिधींचे म्हणणे आहे या बाबीची दक्षता घेऊन सदर जनसुनावणी रद्द करण्यात यावी. शेतकऱ्यांच्या जमीनीचा मोबदला व रोजगाराबाबत गांभीर्याने विचार करवा. म.प्र.नि. मंडळ, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ वेळोवेळी तक्रार केली. सदर तक्रारींचया अनुषंगाने म.प्र.नि. मंडळ व रेल्वे अधिकाऱ्यांनी माहिती दिली की रेल्वेने ११८० बांबूची झाडे लावली. मा. जिल्हाधिकारी महोदयांनी याची शहानिषा करणे गरजेचे आहे. येथे उपस्थित जनतेला विनंती आहे की त्यांनी खोट्या आशेवर राहू नये. तुमच्या कौशल्याचा वापर करून आर्थिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न करावा. रोजगार देताना स्थानिकांना अकुशल असल्याचे सांगून डावलण्यात येते व त्या ठिकाणी परप्रांतीय लोकांना रोजगार देण्यात येते. या गावातील अकुशल व्यक्तिंसाठी कौशल्य विकास करण्याकरिता एक संस्था उभारावी जेणेकरून स्थानिकांमध्ये कौशल्य विकास करून प्रकल्पात रोजगार देता येईल. आम्ही या जमीनीचे मूळ मालक आहोत. यापुढे येणारे प्रकल्प व प्रशासनाने ज्या गावात प्रकल्प येणार आहे तेथील बेरोजगारांनाच नौकरी द्यावी अन्यथा प्रकल्प राबवू देणार नाही. अकुशल कामगारांना कुशल कामगार बनवून त्यांना प्रकल्पात रोजगार द्यावा. येथे उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यात यावे. दि. २२/०८/२०१९ चा मा. जिल्हाधिकारी यांचा खाणकाम आणि खनिज वाहतूकीचा नियम आहे की खाणींतून होणाऱ्या उत्खननाची वाहतूक दिवसा करण्यात यावी. रात्रीच्या वेळी वाहतूक करण्यात | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | येऊ नये. परंतु त्या आदेशाकडे दुर्लक्ष करून रात्रीच्या वेळी उत्खनन करून वाहतूक करण्यात येते व त्यामुळे रस्ते खराब होतात. रस्त्यांची वाहन क्षमता वाढविण्यात यावी. | |

४८) **श्री. प्रविण बांधोळे, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या परिसरातील पहिली खाण ही राजूर कॉलरी आहे. या क्षेत्रात एखादा आदर्श प्रकल्प द्यावा अशी माझी मागणी आहे. माझी विनंती आहे की मुकुटबन येथील प्लांटला भेट देण्यात यावी आणि जर तो प्लांट लोकाभिमुख असेल तर या प्रकल्पाला देखील मान्यता देण्यात यावी. तिथल्या प्लांटची माहिती घ्या. एका खाण प्रकल्पामुळे रस्ते खराब होतात व शेतपिकांचे नूकसान होते. याबाबत तक्रारकरून देखील कार्यवाही करण्यात आली नाही. मध्यंतरी डोंगरगांव येथे जनसुनावणी झाली तेथेदेखील काही कार्यवाही करण्यात आली नाही. आरसीसीपीएल कंपनीने जनसुनावणीदरम्यान दिलेली आश्वासने पूर्ण केली किंवा कसे याबाबत तपासणी करावी व त्यानंतरच या प्रकल्पाला परवानगी देण्यात यावी. आपण ज्या रस्त्याने या ठिकाणी आलात त्या रस्त्याची अवस्था फार वाईट आहे. रस्त्यांची अवस्था सुधारण्यात यावी जेणेकरून अपघाताचे प्रमाण कमी होईल. परिसरातील उद्योगांनी वाहतूकरीवर नियंत्रण ठेवावे. ४० ते ४५ वर्षांपासून परिस्थितीमध्ये सुधारणा झालेली नाही. यामुळे जनसामान्यांचे नूकसान होत आहे. प्रकल्पग्रस्तांसोबत खुली बैठक घ्यावी जेणेकरून त्यांच्या समस्या सोडविण्यास मदत होईल. या परिसरात बंद करण्यात आलेल्या खुल्या खाणीचे खड्डे बुजविण्यात आले नाहीत. त्या खड्ड्यांमध्ये येथील त्रास्त नागरीक आत्महत्या करीत आहेत. गौरळा येथील खाणीतून डोलोमाईटची वाहतूक रात्री करण्यात येते व त्याच्या धुळीमुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. त्यावर नियंत्रण आणणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

४९) **श्री. समीर बांदूरकर, कुरली, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आम्ही मागील वर्षी या परिसरातील प्रदूषणाबाबत निवेदन दिले होते. प्रशासकीय व्यक्ति या रस्त्याने प्रवास करतात तेव्हा त्यांना प्रदूषण दिसत नाही का? येथे लोकप्रतिनिधींने उपस्थित केलेल्या मुद्यांची गंभीरतेने दखल घेतली पाहिजे. सदर जनसुनावणी रद्द करून सुधारित अहवाल तयार केल्यानंतरच परत जनसुनावणी घेतली पाहिजे. हातला गाव ते फाटा या रस्त्यावर धुळीचे प्रमाण खूप जास्त आहे. त्यावर उपाययोजना करण्यात यावे. परिसरात उष्णतेचे प्रमाण जास्त असल्याने दुचाकी वाहन चालविताना हेल्मेट वापरणे शक्य होत नाही. धुळीमुळे नागरीकांना श्वसनाचे आजार होत आहेत. मी दम्याच्या आजाराने ग्रस्त आहे. छोट्या गोष्टींसाठी आंदोलन करण्याकरिता आमच्याकडे वेळ नाही. त्यामुळे गावकऱ्यांचे मुद्दे प्रदूषणाचे मुद्दे, कोर झोन व बफर झोनचे मुद्दे सोडविण्यात यावे. प्रामुख्याने रस्ते दुरूस्त करण्यात यावे. सर्वप्रथम अस्तित्वात असलेल्या प्रदूषणाच्या समस्या सोडविण्यात याव्यात व त्यानंतर प्रकल्पाकरिता जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया सुरू करण्यात यावी. कंपनी ४८० हेक्टर जागा अधिग्रहीत करणार म्हणून म.प्र.नि. मंडळ कुरई गावात आले परंतु मागील वर्षी ४० लोकांचा प्रदूषणामुळे मृत्यू झाला त्यावेळी प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी दिसले नाहीत. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

५०) **श्री. दिपक दिक्षीत, प्रकृती फाऊंडेशन, चंद्रपूर (ऑनलाईन माध्यमातून):-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | एसीसी कंपनीने पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये दिलेली आकडेवारी चुकीची व दिशाभूल करणारी आहे. त्यामध्ये नमूद आहे की २.० ते २.५ किमी अंतरावर वन क्षेत्र आहे. मुळात ते व्याघ्र क्षेत्र आहे. ०.५ ते १.० किमी अंतरावर खाणीची सीमारेषा आहे. वन्यजीव व्यवस्थापन आराखड्याचा समावेश पर्यावरण आघात मुलयांकन अहवालामध्ये केलेला नाही. प्रकल्प प्रवर्तकांना वन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर जागा वन विभागाची आहे किंवा नाही याबाबत निर्णय यायचा आहे. वनस्पती आणि जीवजंतुची यादी संबंधित विभागाकडे मान्यतेसाठी सादर केलेली आहे व मान्यता प्राप्त झाल्यानंतर वन्यजीव व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात येईल. शेड्युल-१ प्रमाणे यादी बनविण्यात येईल व संवर्धनाचे काम करण्यात येईल. ४८० हेक्टर क्षेत्रापैकी २.९४ हेक्टर क्षेत्र वन विभागाची आहे व राज्य |

| | | |
|---|---|---|
| | सदर खाणीमुळे वर्धा व पैनगांगा या नद्यांचे पाणी प्रदूषित होणार आहे. | शासनाकडून सदर जागा वगळण्यात यावी याकरिता अर्ज सादर केलेला आहे व परवानगी मिळालेली आहे. जेव्हा जमीन अधिग्रहणाच्या प्रक्रियेला सुरूवात होईल तेव्हा सदर २.९४ हेक्टर क्षेत्र वगळण्यात येईल. सदर २.९४ हेक्टर क्षेत्राचे अधिग्रहण करावयाचे असल्यास वन विभागचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे कंपनीकरिता बंधनकारक राहणार. वनस्पती व जीवजंतु बाबत कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे. |

**५१) डॉ. पंकज आशिया, अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा जिल्हाधिकारी, <u>यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | सूचना |
|---|---|
| १) | येथे स्थानिकांमध्ये संभ्रम आहे की पर्यावरण विषयक जनसुनावणी झाली की लगेच जमीन अधिग्रहणाच्या प्रक्रियेला सुरूवात होईल. पर्यावरण विषयक जनसुनावणीमध्ये पर्यावरणावर होणाऱ्या आघाताबाबत जनतेचे मत जाणून घेण्यासाठी जनसुनावणी घेण्यात येते. येथे प्रकल्पाला मंजूरी देण्यात येत नाही. जनसुनावणीदरम्यान उपस्थित सर्व मुद्यांची नोंद घेण्यात येते व शासनाकडे अहवाल सादर करण्यात येतो. पर्यावरणीय मंजूरी मिळाल्यानंतरच कंपनीला पुढील प्रक्रिया सुरू करता येते. त्यामुळे नागरीकांनी घाबरायचे कारण नाही. सदर प्रकल्प शासकीय नाही म्हणून कुणीही जबरदस्तीने जागा घेणार नाही. ७/१२ वरून तुमचे नाव काढु शकत नाही. कंपनीला व नागरीकांना माझे सांगणे आहे की जमीन घेण्याच्या प्रक्रियेमध्ये सावधानी असावी. कंपनीने पर्यावरण आघात मुल्यांकनाची प्रत मराठी भाषेमध्ये ग्रामस्थांना द्यावी. बैठक घेऊन लोकांची किती जमीन जाणार आहे याची माहिती द्यावी. ग्रामपंचायत व जमीनधारकांसोबत कंपनीने पारदर्शक बैठक घ्यावी. पंचायत समितीमधून नोड अधिकारी व ग्रामसेवक समोर जमीन अधिग्रहणाबाबत चर्चा करावी. त्याचा व्हिडीओ तयार करावा व त्याची एक प्रत ग्रामपंचायतीला देखील देण्यात यावी. सदर बैठकीबाबत गावात नोटीस बोर्ड लावावा. रोजगार देताना सर्व नियमांचे पालन करण्यात येईल. नियमांचे उल्लंघन आढळून आल्यास त्यावर प्रशासनातर्फे कारवाई करण्यात येईल. ज्यांचे शिक्षण झाले आहे व ज्यांना कौशल्य आहे अशा बेरोजगारांची ग्रामपंचायतीने यादी तयार करावी. सदर यादीप्रमाणे कंपनीने रोजगार उपलब्ध करून द्यावा. कौशल्याबाबत गावामध्ये कंपनीने सर्वेक्षण केले पाहिजे. ज्यांच्याकडे कौशल्य नसेल अशा लोकांसाठी कंपनीने कौशल्य विकास कार्यक्रम राबवावा जेणेकरून सर्वसामान्यांमध्ये कंपनीबाबत चांगली प्रतिमा बनेल. भूसंपादन करताना लोकांना कंपनीने सांगावे की किती जमीन घेणार व केव्हा घेणार. येथे काही समस्या उद्भवल्यास शासकीय अधिकाऱ्यांना त्यात समाविष्ट करण्यात यावे व तोडगा काढण्यात यावा. पाण्यामुळे व प्रदूषणामुळे आजार असतील तर त्याची कंपनीने आरोग्य शिबीरांमध्ये तपासणी करावी व वैद्यकीय उपचार उपलब्ध करून द्यावा. सामाजिक उत्तरदायित्व निधीमध्ये विकास कामे करावी. कंपनीचा प्रकल्प असल्यास कंपनीने तेथील रस्त्यांच्या व इतर समस्या सोडविल्या पाहिजे. आपल्याकडे फक्त खनिज विकासाचे पैसे येतात. सामाजिक उत्तरदायित्व निधी मधून विकास कामे झाली पाहिजे. मप्रनि मंडळाने देखील त्यांच्याकडे येणाऱ्या तक्रारींवर लवकर कारवाई करावी. कुंपणाने व बॅरिकेडींगचे काम केले पाहिजे. नागरीकांचे जनावर खाण खड्ड्यामध्ये पडायला नको. आजची जनसुनावणी फक्त पर्यावरणाशी संबंधित आहे. आपल्या सर्व मुद्यांची येथे नोंद घेण्यात आली आहे व ते शासनाकडे सादर करण्यात येईल. पर्यावरणावर होणाऱ्या प्रभावाचे काही मुद्दे:- |

| | |
|---|---|
| | १) नाला व नदीच्या उगमस्थानावर काही होणार नाही.<br>२) भूजल पातळीचे नूकसान होणार नाही हे बघणे. भूजलाची गुणवत्ता खराब होणार नाही याची काळजी घ्यावी.<br>३) ब्लास्टींग व वाहूतकीमुळे होणाऱ्या नूकसानीबाबत काय मोबदला देणार. गावकऱ्यांसोबत कंपनीने चर्चा करावी व त्यावर उपाय काढावे.<br>४) तटबंदी व Barricading बाबत काम केले पाहिजे.<br>५) मातीची गुणवत्ता खराब होणार असेल तर त्यावर कंपनी काय उपाययोजना करणार याचा समावेश पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये कंपनीने करावा.<br>६) जैव विविधतेमध्ये जनावरे, झाडे यांच्यावर होणाऱ्या प्रभावाकडे कंपनीने लक्ष द्यावे.<br>७) डंपींगमुळे नूकसान झाल्यास कंपनी काय काळजी घेणार.<br>८) जनतेने त्यांचे इतर प्रकल्पाच्या प्रभावाचे मुद्दे मांडले. त्याचा व्हिडीओ देखील आहे. शासन निर्णय घेईल. भूसंपादनमध्ये शासकीय नसल्यामुळे कोणी जबरदस्ती करू शकत नाही. कंपनी शेतकऱ्यांशी थेट संपर्क करणार आहे. |

५२) **<u>श्री. आशिष फुलसंगे, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | सगळ्यांनी मांडलेले मुद्दे पुन्हा घ्यावे व ही जनसुनावणी पुन्हा घ्यावी. आमची ही मागणी आहे की आज ही जनसुनावणी रद्द करून पुन्हा घ्यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याची विनंती केली. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल स्थानिकांचे व त्याचप्रमाणे सर्वांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले १६३ सूचना, आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

**(उमाशंकर भादुले)**
समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर

**(तानाजी यादव)**
सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर

**(डॉ. पंकज आशिया, भा.प्र.से.)**
अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा जिल्हादंडाधिकारी, जिल्हा यवमताळ